महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
मादाम माका मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुख्य इमारत, १ ला मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**ईमेल- doj1.rfd@maharashtra.gov.in**

**क्रमांक : जमीन-२०२४/प्र.क्र.३१/ज-१** **दिनांक :- ०६ जून, २०२४**

**प्रति,**

**जिल्हाधिकारी (सर्व)**

**विषयः- भोगवटादार वर्ग-२ चा धारणाधिकार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणेबाबत शासन अधिसूचनेतील तरतुदीनुसार विहीत कालमर्यादेत कारवाई करणेबाबत.**

**संदर्भ:-** १) शासन अधिसूचना क्र.जमीन-२०१८/प्र.क्र.९०/ज-१,दि. ०८/०३/२०१९
२) शासन अधिसूचना क्र. जमीन-२०२२/प्र.क्र.१७०/ज-१,दि.२७/०३/२०२३
३) शासनाचे समक्रमांकाचे दि. २१/०२/२०२४ रोजीचे पत्र
४) शासनाचे समक्रमांकाचे दि. ०१/०३/२०२४ रोजीचे पत्र
५) शासनाचे समक्रमांकाचे दि. १२/०३/२०२४ रोजीचे पत्र

"महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) नियम, २०१९" मधील तरतुदीनुसार सवलतीच्या दराने भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनीचा धारणाधिकार भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याच्या अनुषंगाने दि. ०७ मार्च,२०२४ रोजीपर्यंत सक्षम प्राधिकाऱ्यांकडे प्राप्त प्रकरणांचा निपटारा पुढील ३ महिन्यांच्या कालावधीत म्हणजेच, दि. ०७ जून, २०२४ पर्यंत करण्याच्या सूचना वर नमूद संदर्भ क्र. ४ व संदर्भ क्र. ५ येथील दि. ०१ मार्च, २०२४ व दि. १२ मार्च,२०२४ च्या पत्रान्वये देण्यात आल्या होत्या.

**०२.** तथापि, दि.१६ मार्च, २०२४ पासून जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व यंत्रणा लोकसभा निवडणूकीच्या कामात व्यस्त असल्याने उपरोक्त नमूद अनेक अर्जांवर अद्याप कार्यवाही करणे शक्य झाले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे.

**०३.** उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, दि. ०७ मार्च, २०२४ रोजीपर्यंत सक्षम प्राधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेल्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठीची मुदत आता दि. ०७ सप्टेंबर, २०२४ पर्यंत तसेच अर्जदारांना पैसे भरण्याची मुदत दि. ३० सप्टेंबर, २०२४ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

**०४.** तरी, विहीत कालावधीत सर्व सक्षम प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त प्राप्त प्रकरणांचा निपटारा कोणत्याही परिस्थितीत दि. ०७ सप्टेंबर, २०२४ पर्यंत करावा, ही विनंती.

**(विनायक लवटे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) ज- समूहातील सर्व सह सचिव / उप सचिव
२) विभागीय आयुक्त (सर्व)
३) निवड नस्ती ज-१

g:\vishakha\class २ to class १\cr ३१ ०६.०६.२०२४ ltr.docx२